
ePaper

# शिर्डीच्या साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी!

वर्ष - 8 । अंक - 272 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- आरसीबीचा चेन्नईवर थरारक विजय
- वैभव सूर्यवंशी १४ वर्षांचा वाटतो का?
- पाकिस्तानची चहुबाजूने कोंडी
- आपण पाकिस्तानइतके क्रूर नाही


www.mahaenews.com | रविवार, दि. 4 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाकिस्तानची कोंडी सुरूच ; आता आयात-निर्यातही पूर्णपणे रोखली !

# युद्ध अटळ, थेट LOC वर, लष्कराची जमवाजमव!

## अजित डोवाल, नौदलप्रमुख दिनेश त्रिपाठी यांच्याशी मोदींची रात्री उशिरापर्यंत बैठक..

। नवी दिल्ली / श्रीनगर / इस्लामाबाद ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पाकिस्तान विरोधातील युद्ध आता अटळ होऊ लागले आहे. सीमेजवळ, प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आणि सर्व सीमेवर प्रचंड तणाव असून लष्करी हालचालींना चांगलाच वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर रात्री उशिरा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल तसेच नौदलप्रमुख अ‍ॅडमिरल दिनेश त्रिपाठी यांना खास बोलावून घेऊन त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. सुरक्षा यंत्रणेचा आढावा घेतला.**





### पाकिस्तानातून आयात-निर्यात बंद...

पाकिस्तानचे एकीकडे पाणी बंद केल्यानंतर आणि त्यांच्याशी सर्व व्यापार बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता भारत सरकारने अतिशय मोठा निर्णय घेतला असून आयात-निर्यातीवरही बंदी घालण्यात आली आहे. दोन्ही देशांदरम्यानचा व्यापार बंद झाल्यामुळे पाकिस्तानची चोहोबाजूंनी आर्थिक कोंडी होणार आहे.

### पहिली चढाई समुद्रामार्गे ?

भारत हल्ला करणार या वृत्ताने पाकिस्तानात घबराट निर्माण झाली असतानाच सर्वात पहिला हल्ला हा समुद्रामार्गे होईल की काय, अशी शंका संरक्षणज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. भारताची लढाऊ नौका 'आय एन एस विक्रांत' अरबी समुद्रात केव्हाच जाऊन उभी राहिली असून त्यावर क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी घेतली जात आहे. पाकिस्तानातील प्रमुख नौदल अड्डे आणि शहरे या क्षेपणास्त्रांच्या अगदी टप्प्यात आहेत, हे तपासले जात आहे.

### लढाऊ विमाने चक्क रस्त्यावर..

प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यानंतर पाकिस्तानकडून भारतीय विमानतळांचे नुकसान केले जाईल,हे गृहीत धरून सराव करणारी लढाऊ विमाने उत्तर प्रदेशातील अनेक महामार्गांवर यशस्वीपणे उतरवण्यात आली आहेत. भारताची ही चाल खरोखर अवाक् करणारी आहे.

### चारही बाजूंनी कोंडी !

पाकिस्तानची चारही बाजूंनी कोंडी करण्याचा भारताने केलेला प्लॅन यशस्वी होत चालला आहे. सिंधू पाणी वाटप करार रद्द करणे, पाकचा व्हिसा रद्द करणे, पाकिस्तानच्या आयातीवर बंदी घालणे, हे निर्बंध लादले आहेत. थेट युद्ध न करता भारत पाकिस्तानला अनेक मार्गांनी धडा शिकवू शकतो, असे मत आंतरराष्ट्रीय अभ्यासक मांडत आहेत.

### दहशतवाद्यांविरोधात कारवाई..

लष्कर-ए-तोयबाचा प्रमुख हाफिज सईद आणि दहशतवादी मसूद अझहर हे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले करतात, तेथे दहशतवादाचे अड्डे चालवतात, हे जगासमोर आणण्यात यश आले आहे. आता, जसे अमेरिकेने ओसामा बिन लादेनला शोधून त्याचा शेवट केला होता. त्या पद्धतीने भारताने हाफिज सईद आणि मसूद अझहरचा खातमा करणे आवश्यक आहे. त्यासाठी सॅटेलाईटसारखी अत्याधुनिक साधने भारताने वापरली पाहिजेत. दहशतवाद्यांचे हे दोन म्होरके अनेकदा पाकिस्तानमध्ये बॉम्बस्फोटमध्येही बचावले आहेत. या दोघांना शोधण्यासाठी भारताने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले पाहिजेत. अशी मोठी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पाकड्यांना जगासमोर उघडे नागडे केले..

पहलगाम येथील हल्यानंतर भारताने जी तातडीने पावले उचलली ती पाकिस्तानची गुप्तता चिरफाड करणारी ठरली. काश्मीर खोऱ्यात एन. आय. ए. मार्फत चौकशी हाती घेऊन आणि ती विक्रमी वेळात पूर्ण करून या हल्ल्यामागे पाकिस्तान, त्यांचे लष्कर आणि गुप्तहेर संघटना आय. एस. आय. चा सहभाग आहे, हे भारताने जागतिक पातळीवर सिद्ध केले. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी यावेळी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी जास्तीत जास्त राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी थेट चर्चा केली आणि पाकिस्तानला जगासमोर अक्षरशः उघडेनागडे केले आहे.

### मुनीर बिळात लपला..

पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या काश्मीरबद्दलच्या विधानानंतर पहलगाम हल्ला झाला आहे. त्यामुळे मुनीर हेही या हल्ल्याला जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. मुनीर यांनी पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणांचे नेतृत्व केलेले आहे. पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय' चे ते प्रमुख होते. परंतु तत्कालीन पंतप्रधान इम्रान खान यांनी त्यांना हटविले होते. जनरल मुनीर हे २०२२ मध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख झाले. इम्रान खान हे आताभ्रष्टाचाराच्या प्रकरणात तुरुंगात आहेत.

### पाकिस्तानचे चार तुकडे

पाकची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. तसेच या देशात गृहयुद्ध सुरू आहे.

# कोंडी फोडण्यासाठी दुभाजक तोडणार!

## उड्डाणपुलावरील वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल ते फनटाइम हा उड्डाणपूल सुरू करूनही सिग्नलमुळे कोंडी होत असल्याचे लक्षात आल्यावर पुणे महापालिकेचे अधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांनी शनिवारी तातडीने बैठक घेतली. वीर बाजी पासलकर चौकातील वाहतूक नियंत्रण दिव्यांचे ‘सिक्रोनायझेशन’, दुभाजक तोडणे आणि स्वतंत्र मार्गिका करण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.**



पोलिसांनी आवश्यक उपाययोजना करण्यास सुरुवात केल्याने शनिवारी दुपारनंतर या उड्डाणपुलावरील वाहतूक सुरळीत झाली.सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी बांधण्यात आलेला उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केल्यावर वीर बाजी पासलकर चौकातील वाहतूक नियंत्रण दिव्यांचा (सिग्नल) कालावधी वाढविणे गरजेचे होते. मात्र, महापालिका आणि वाहतूक पोलिसांमधील नियोजनाच्या अभावामुळे पूल वाहतुकीस खुला झाल्यावर पहिल्याच दिवशी वाहतुकीचा बोजवारा उडाल्याचे निदर्शनास आले होते.त्यानंतर शनिवारी झालेल्या बैठकीस महापालिकेचे प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, तसेच महापालिका आणि पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ‘या बैठकीत चौकातील वाहतूक नियंत्रण दिव्यांचे सिक्रोनायझेशन करावे, तसेच अन्य काय उपाययोजना कराव्या लागतील, याचा आढावा घेण्यात आला. या रस्त्यावर वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, यासाठी काही ठिकाणी दुभाजक तोडावे लागणार आहेत. तसेच नव्याने मार्गिका आखण्याचा निर्णय घेण्यात आला,असे देशमुख यांनी सांगितले.खडकवासला, धायरी, वडगाव, नऱ्हे यांसह अन्य भागात जाण्यासाठी नागरिकांनी या नवीन उड्डाणपुलाचा वापर सुरू केला आहे. विठ्ठलवाडीपासून वीर बाजी पासलकर चौकात जाण्यासाठी वाहनचालकांना चार ते पाच मिनिटांचा वेळ अपेक्षित आहे. चौकात होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी समन्वयाने यावर तोडगा काढणे आवश्यक आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास येथे वाहतूक कोंडी समस्या कायम राहील. तसेच उड्डाणपुलाचा हेतूदेखील साध्य होणार नाहीपोलिसांनी आवश्यक उपाययोजना करण्यास सुरुवात केल्याने शनिवारी दुपारनंतर या उड्डाणपुलावरील वाहतूक सुरळीत झाली.सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी बांधण्यात आलेला उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केल्यावर वीर बाजी पासलकर चौकातील वाहतूक नियंत्रण दिव्यांचा (सिग्नल) कालावधी वाढविणे गरजेचे होते.

### अधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेतली

मात्र, महापालिका आणि वाहतूक पोलिसांमधील नियोजनाच्या अभावामुळे पूल वाहतुकीस खुला झाल्यावर पहिल्याच दिवशी वाहतुकीचा बोजवारा उडाल्याचे निदर्शनास आले होते.त्यानंतर शनिवारी झालेल्या बैठकीस महापालिकेचे प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, तसेच महापालिका आणि पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ‘या बैठकीत चौकातील वाहतूक नियंत्रण दिव्यांचे सिक्रोनायझेशन करावे, तसेच अन्य काय उपाययोजना कराव्या लागतील, याचा आढावा घेण्यात आला. या रस्त्यावर वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, यासाठी काही ठिकाणी दुभाजक तोडावे लागणार आहेत.

# पुरंदरमध्ये आंदोलक-पोलिसांत धुमश्चक्री

## लाठीमारात ग्रामस्थ, तर दगडफेकीत पोलीस जखमी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षणाला सुरुवात झाली असून, कुंभारवळण येथील स्थानिक नागरिकांनी भूसंपादनाला विरोध करण्यासाठी दगडफेक केली असता, पोलिसांनी लाठीमार आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. त्यामध्ये आंदोलकांसह पोलीसही जखमी झाले. स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांमध्ये शनिवारी दुपारी साडेतीन वाजता झालेल्या या धुमश्चक्रीमुळे परिसरात तणाव निर्माण झाला. या प्रकारानंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी भूसंपादनाला तात्पुरती स्थगिती दिली.**



जिल्हा प्रशासनाने पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षणाला सुरुवात केली आहे. एखतपूर या गावातील सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले. कुंभारवळण या गावातील सर्वेक्षणाचे शनिवारी काम सुरू असताना संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. ग्रामस्थ आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये बाचाबाची झाली. ग्रामस्थांनी बंदोबस्तासाठी असलेले पोलीस आणि जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या पथकावर दगडफेक केली. त्यानंतर पोलिसांनी सौम्य लाठीमार करून अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. या प्रकारात ग्रामस्थ आणि काही अधिकाऱ्यांसह पोलीस कर्मचारी जखमी झाले.या घटनेत येथील नागरिक जखमी झाले, ही बाब अतिशय वेदनादायी आणि अस्वस्थ करणारी आहे. शासनाने जनतेच्या भावना लक्षात घेऊन संयम व संवेदनशीलता दाखविणे आवश्यक होते. शासनाने हा विषय संवेदनशीलतेने हाताळावा,’ अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख म्हणाले, ‘जिल्हा प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक शनिवारी या भागात जमीन मोजणीसाठी आले. अनुचित घटना घडण्याची शक्यता गृहीत धरून या भागातील बंदोबस्त वाढवण्यात आला होता. मोजणीचे काम सुरू असताना ग्रामस्थ आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये वाद झाला. ग्रामस्थांनी मोजणीस विरोध केला. दुपारी साडेतीनच्या सुमारास पोलीस आणि जिल्हा प्रशासनाचे कर्मचाऱ्यांचे पथक तेथून जात असताना दगडफेक करण्यात आली. त्यानंतर संभाव्य अनुचित घटना रोखण्यासाठी सौम्य लाठीमार करण्यात आला. तसेच अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या.’पुरंदर येथील नियोजित विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील सुमारे २८३२ हेक्टर भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यामध्ये वनपुरी, कुंभारवळण, उदाचीवाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव मेमाणे यांचा समावेश आहे. या विमानतळाला काही ग्रामस्थांचा विरोध आहे. ग्रामस्थांनी वेळोवेळी विरोध करून प्रशासनाला निवेदने दिली आहेत.

### पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विमानतळ नियोजित जागी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानंतर भूसंपादनासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले. घटनेनंतर ग्रामस्थांनी सासवड पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. या भागातील परिस्थिती नियंत्रणात असून, बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## थकबाकी वसुलीसाठी महापालिकेची कारवाई


# मिळकतकर थकबाकीदारांचे वाहन जप्त होणार!

### प्रादेशिक परिवहन कार्यालय सोबत करार करण्याचा पालिकेचा विचार

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मिळकतकर थकबाकीदारांच्या सदनिकेच्या भाग दाखल्यावर (शेअर सर्टिफिकेट) थकबाकी नोंदीची प्रक्रिया सुरू केली असताना आता पिंपरी-चिंचवड महापालिकेने थकबाकीदारांचा गृहनिर्माण सोसायटीतील वाहनतळ क्रमांक मागविला आहे. सोसायटीच्या अध्यक्ष, सचिवांना पत्र लिहून ही माहिती मागविली आहे. माहिती मिळताच थकबाकीदारांची वाहने जप्त करण्याचा निर्णय कर संकलन विभागाने घेतला आहे.**






पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख ३३ हजार ६६४ निवासी, औद्योगिक, मिश्र, मोकळ्या जमिनी, औद्योगिक अशा मिळकती आहेत. यांपैकी २०२४-२५ या आर्थिक वर्षात पाच लाख ४७ हजार ६२९ हजार, तर नव्याने नोंदणी झालेल्या ६० हजार ७२ मिळकतधारकांनी ९६६ कोटी रुपयांचा करभरणा केला, तर पाच हजारांपेक्षा अधिक रुपयांची थकबाकी असलेले एक लाख तीन हजार ६७ मिळकतधारक आहेत. त्यांच्याकडे ४५८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये सर्वाधिक ८२ हजार २५६ मिळकती निवासी आहेत.या थकबाकीदारांच्या सदनिकेच्या भाग दाखल्यावर थकबाकीची नोंदणी केली जात आहे. सभासदांनी मिळकतीची संपूर्ण रक्कम भरल्याशिवाय कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र देऊ नये. मिळकतकराची थकबाकी नसल्याचा करसंकलन विभागाचा दाखला सादर केल्यानंतरच भाग दाखल्यावरील नोंदी रद्द कराव्यात, असे पत्र महापालिकेने सोसायटीचे अध्यक्ष आणि सचिवांना दिले आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या लिांबरोबरच थकबाकीदारांना मिळकती जप्त करण्याच्या नोटिसाही देण्यात येत आहेत. त्याशिवाय थकबाकीदारांच्या वाहन क्रमाकांचीही माहिती मागविण्यात येत आहे. सोसायटीचे अध्यक्ष, सचिवांनी आठ दिवसांत माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

#### वाहनांच्या आरसी बुकवर नोंद

थकबाकीदारांच्या वाहनांचा क्रमांक टाकून मालकाचा शोध घेण्यात येणार आहे. थकबाकीदार असलेल्या वाहन मालकांच्या वाहनाचे नूतनीकरण करू नये, 'आरसी' बुकवर थकबाकीची नोंद करावी. त्या संदर्भात पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी करारनामा करण्याचे विचाराधीन असल्याचे कर संकलन विभागाने सांगितले.

#### जप्त मालमत्तांचा जूनमध्ये लिलाव

मागील आर्थिक वर्षात १ हजार ७५ मालमत्ता महापालिकेने जप्त केल्या होत्या. पहिली, दुसरी नोटीस दिल्यानंतर ६२५ मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला. वारंवार आवाहन करूनही ४५० मालमत्ताधारकांनी अद्याप कर भरला नाही. त्यामुळे या मालमत्ता सील आहेत. जप्त मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे. मालमत्तेचे मूल्य काढण्यात येत आहे. जूनमध्ये कोणत्याही परिस्थितीत या मालमत्तांचा लिलाव करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले

> निवासी थकबाकीदारांच्या वाहन क्रमांकांची माहिती मागविण्यात आली आहे. ही माहिती मिळताच वाहने जप्त केली जाणार आहेत. बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र या मिळकती सील करण्यात येणार आहेत.
>
> -अविनाश शिंदे,
> सहायक आयुक्त, करसंकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

---

## चिखली-चऱ्होली 'टीपी स्कीम'ला आ. लांडगे यांचा विरोध!

### प्रशासनाचा मनमानी कारभार खपवून घेणार नाही; 'टीपी स्कीम'ची कार्यवाही स्थगित करण्याची मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महानगरपालिकेच्या माध्यमातून नियोजित चिखली- चऱ्होलीतील शहर विकास (TP) आराखड्याला आमदार महेश लांडगे यांनी तीव्र विरोध केला आहे. सदर 'टीपी स्कीम'ची कार्यवाही तात्काळ स्थगित करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.**







याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, प्रशासनाच्या माध्यमातून चिखली आणि चऱ्होलीसाठी 'टाऊन प्लॅनिंग स्कीम' घोषित करण्यात आली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून माझा या 'टीपी स्कीम'ला पूर्ण विरोध आहे. भूमिपुत्र आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांना विश्वासात न घेता प्रशासन मनमानीपणे 'टीपी स्कीम' राबवू शकत नाही. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांना विश्वासात घेऊन चिखली-चऱ्होली परिसरात 'टीपी स्कीम' राबवणे अपेक्षित होते. मात्र, प्रशासक राजवट पुढे करून भूमिपुत्र व स्थानिकांवर अशाप्रकारे स्कीम लादणे अत्यंत खेदजनक आहे.

भारतीय जनता पार्टीच्या सत्ता काळात गेल्या 10 वर्षांमध्ये पिंपरी- चिंचवडमधील समाविष्ट गावांचा सर्वांगीण विकास झालेला आहे. आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून तळागाळामध्ये काम करीत आहोत. समाविष्ट गावांमधील वाडी वस्तीवर रस्ते, पाणी, वीज आणि ड्रेनेज व्यवस्था सक्षम करण्यासाठी आम्ही कायम पुढाकार घेतला आहे.

#### 'टीपी स्कीम' भूमिपुत्र, लघु उद्योजकांसाठी अन्यायकारक!

आयुक्त आणि प्रशासक या नात्याने आयुक्त शेखर सिंह यांनी स्थानिक नागरिक आणि भूमिपुत्रांना विश्वासात घेऊन टीपी स्कीम राबवणे आवश्यक आहे. मात्र, लोकप्रतिनिधींना टीपी स्कीम प्रसिद्ध झाल्याचे वर्तमानपत्रातून किंवा प्रसारमाध्यमातून समजते, ही बाब आश्चर्यकारक आहे. 2017 ते 2022 या काळात भारतीय जनता पार्टीची महापालिकेमध्ये सत्ता होती. त्यावेळी महापालिका प्रशासनाने चऱ्होलीमध्ये टीपी स्कीम राबवण्याची कार्यवाही सुरू केली होती. पण, स्थानिक लोकप्रतिनिधी व भूमिपुत्रांना विश्वासात न घेतल्यामुळे प्रशासनाचा आम्ही त्याला तीव्र विरोध केला होता. आता पुन्हा अशाप्रकारे चऱ्होली चिखलीकरांवरती प्रशासन टीपी स्कीमचा निर्णय लादणार असेल, तर ही बाब भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांसाठी अन्यायकारक आहे. त्यामुळे सदर टीपी स्कीम योजना कार्यवाहीला तात्काळ स्थगिती द्यावी, अशी आग्रही मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### निश्चयपूर्वक नामस्मरण आणि चित्तशुद्धी

मला अजून अमुक करायचे आहे ही कल्पना सोडून द्यावी. आता मी परमेश्वराचा झालो, आता मला काही करायचे राहिले नाही, अशी मनाची स्थिती झाली पाहिजे. 'हे परमेश्वरा, आता तुझ्याकरताच मी जगेन, तुझ्या नामस्मरणाशिवाय मला काही कर्तव्य उरले नाही.' असा निश्चय केला तर मनाला समाधान झालेच पाहिजे. 'नामस्मरण होत नाही, कारण वयामुळे मन थकले,' हे म्हणणे बरोबर नाही. शरीर थकेल, कारण लहानपणी वाढणे आणि वृद्धपणी थकत जाणे, हा शरीराचा निसर्गक्रमच आहे; परंतु मन थकले हे मात्र सयुक्तिक नाही. मन हा परमेश्वराचा अंश आहे, असे आपल्या दिव्य विभूती सांगताना भगवंतांनी सांगितले आहे. मनाची अत्यंत क्षीणतेची अवस्था म्हणजे मृत्युसमयीची; परंतु त्या समयीही माझे स्मरण ठेवावे असे भगवंतांनी सांगितले असताना, त्यापूर्वी केव्हाही, मन थकले आणि स्मरण करू शकत नाही असे होणे शक्य नाही. पूर्वी सहा-सहा तास बसून जप केलेला असेल, तितका आता होत नसेल, तितके बसवणार नाही. मध्ये-मध्ये झोप लागत असेल, हे मान्य आहे; पण स्मरण राहू शकत नाही असे नाही होणार. मन थकले ही खरी अडचण नसून मनाचा इतर व्याप फार आहे हे खरे कारण आहे. तेव्हा, सर्व व्यापांतून आणि काळजीतून लक्ष काढून ते भगवंताकडे लावणे जरूर आहे. पैसाअडका, प्रपंचातल्या सर्व गोष्टी, यांचा मनाने त्याग करावा. असा त्याग केला तर कार्यभाग निश्चित होतो हे मी खात्रीने सांगेन. पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा, माणसाला भगवंतापासून दूर नेतात; त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे, त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत. धर्माचरण, भगवद्भक्ती, नामस्मरण आणि सत्संग हे चित्तशुद्धीचे उपाय होत. किंवा एकाच शब्दात असे म्हणता येईल की, सत्संग हाच याला तोडगा आहे. चित्तशुद्धीचे लक्षण हे की, आपल्यासारखेच सर्व जग सुखी असावे ही भावना असणे. ही भावना वाढण्यासाठी, 'सर्व जग सुखी असावे' अशी प्रार्थना करण्याचा नेहमी परिपाठ ठेवावा, म्हणजे हळूहळू भगवत्कृपेने साधेल. अभिमान हा मात्र चित्तशुद्धीत बिघाड करणारा आहे, आणि तो केव्हा डोके वर काढील आणि घात करील याचा पत्ता लागणार नाही. पण भगवंताच्या स्मरणामध्ये अभिमानाचे मरण आहे. म्हणून आपण भगवंताचे स्मरण अखंड टिकवूया आणि आनंदाने राहूया.

बोधवचन:- नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही अशी दृढ भावना करावी.




## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# पाकड्यांचे कंबरडे मोडणार, पण..कसे, कुठे आणि कधी?

**काश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतात संतापाची लाट उसळली आहे, त्यापेक्षाही मोठी लाट अपेक्षांची उसळली आहे. पाकड्यांचे कंबरडे मोडण्याची भाषा बहुमतात असलेले एनडीए सरकार आणि या सरकारचे मंत्री उघडपणे करत आहेत. पण, कधी? कुठे? आणि कसे हा प्रश्न अनुत्तरीतच आहे..**



### मोदी सरकारची योग्य पावले..

एकीकडे मोदी सरकारला भक्कम पाठिंबा देऊन दुसरीकडे त्यांचे पाय ओढणारे विरोधक वेगवेगळी भाकिते करत असले तरी सर्वसामान्यांच्या मनात मात्र हा प्रश्न कायम आहे. पुलवामा हल्ल्यानंतर सर्जिकल स्ट्राईकद्वारे पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची स्थळे उद्ध्वस्त करण्यात आली. आताही तशाच प्रकारचा सर्जिकल स्ट्राईक होणार का ? की पाकव्याप्त काश्मीर पुन्हा आपल्या ताब्यात मिळविण्यासाठी युद्ध छेडले जाणार ? की पाकिस्तानचे दोन तुकडे करणारा काहीतरी जबरदस्त संघर्ष सुरू होणार? अशा बहुविध चर्चा सुरू आहेत.

### दिल्लीत बैठकांचा सिलसिला सुरू..

दिल्लीत बैठकांचा सिलसिला कायम असल्याने केवळ भारतवासीयांचेच नाही, तर जगाचेही लक्ष भारत-पाककडे लागले आहे. सर्वप्रथम हे लक्षात घ्यायला हवे की, छुपे किंवा थेट युद्ध पुकारून दहशतवाद संपुष्टात येत नाही. अनेकांना वाटते की, भारताने मोठी कारवाई केली की दहशतवादी हल्ले बंद होतील किंवा पाकव्याप्त काश्मीर भारतात आले की, काश्मीर खोरे शांत होईल! मात्र, असे काहीच होण्याची सुतराम शक्यता नाही.

### आततायी निर्णय मुळीच नको !

आजवरचा इतिहास पाहिला, तर लक्षात येईल की, युद्ध, संघर्ष किंवा आक्रमणाने कुठलाही प्रश्न कायमस्वरूपी मिटलेला नाही. उलट, त्यातून असंख्य धुमारे फुटतात. जखम चिघळते आणि वेदनांची ठसठस तेवढी उरते. कुठल्याही देश किंवा प्रदेशातील वादाकडे पाहिल्यास त्याची खात्री मिळते. सामरिकशास्त्रातील काही तज्ज्ञांच्या मते, भारत-पाक यांना युद्धात खेचण्यासाठी पहलगाम हल्ला घडविण्यात आला आहे. त्याचा सूत्रधार चीन असू शकतो. भारताशी त्याचे फारसे सख्य नाही. दिवाळखोर पाक त्याला सर्वांगाने हवा आहे. शिवाय, भारत हा जगातील तिसरी अर्थव्यवस्था होणार आहे. महासत्ता वाटचालीत चीनला केवळ भारताचा अडथळा आहे.

### काहीतरी वेगळेच ठोकताळे!

भारताला शह देण्यासाठी पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचा वापर करण्यात आला. याद्वारे भारत व पाक युद्धात उतरतील. पाक थेट चीनला शरण जाईल. तसेच, भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसेल, विकासाचा वेग मंदावेल आणि जीवितहानीही मोठी होईल. म्हणजेच, एखाद्या षडयंत्राला आपण बळी पडत आहोत का? याचा विचारही प्रत्युत्तर देताना मोदी सरकारला करावा लागणार आहे.

### आधी विचार करा, मग युद्ध खेळा!

युद्ध हे कुणालाही परवडणारे नसते. त्याची किंमत वसूल केली जातेच. भारत-पाक युद्ध झाले, तर सरकार जनतेवरील करात वाढ करू शकते. याचा परिणाम नागरिकांच्या खर्च आणि गुंतवणूक यावर होईल किंवा भारत सरकार कर्जही घेऊ शकते. ते कुणाकडून घेणार? यातून कर्जबाजारीपणाचा रोग येणार. सरकार दिवाळखोरीच्या दिशेने जाऊ शकते किंवा नोटा छापण्याचा पर्याय आहे. यातून चलन फुगवटा वाढेल. युद्धामुळे महागाई वाढते. जनता होरपळून निघते. आताच्या घडीला युद्ध पुकारणे योग्य आहे का? याचा सारासार विचार सरकारला करावाच लागेल.

### युद्ध सुरू करणे सोपे!

विशेष म्हणजे, युद्ध सुरू करणे सोपे आहे, पण ते थांबवणे अवघड! केव्हा आणि कसे थांबवायचे, याचा निर्णय घेणे अतिशय कठीण असते, तसेच त्यात किती कालापव्यय होईल ? हे सांगता येत नाही. दोन देशांमध्ये युद्ध सुरू झाले की, अन्य देश त्यांचे हिशेब चुकते करण्याची संधी शोधतात. त्यातूनही युद्धग्रस्त देशांना मोठी झळ पोहचते. याचा मागमूसही त्या देशांना लागत नाही. तसेच, सद्यस्थितीत भारताने युद्ध छेडले, तर संरक्षण सामग्रीची मोठी मागणी तयार होईल. त्याचा पुरवठा कुठून आणि कसा होणार? देशांतर्गत संरक्षण उत्पादने होत असले, तरी त्याचे प्रमाण कमीच आहे, हे लक्षात घ्यायला हवे!

### युद्धसामग्रीच्या अनेक समस्या..

रशियासारख्या देशाकडून आपण बहुतांशी उत्पादने व सामग्री घेतो. सध्या रशियाच युक्रेनसोबतच्या युद्धात गुंतला आहे. तेथे त्यांचेच वांदे आहेत. त्यामुळे भारताला संरक्षण उत्पादनांचा पुरवठा होणे शक्य नाही. ऐनवेळी अन्य देशांकडून ती घ्यायची ठरली, तर तो पर्याय भारत स्वीकारेल का? भारतीय शस्त्रास्त्रांना ऐनवेळचे सुटे भाग योग्य ठरतील का? मागणी आणि पुरवठ्याचे संतुलन बिघडले की, दर अवाक्याबाहेर जातात. या समस्येलाही तोंड द्यावे लागेल.

### कारगिल युद्धातील कटू अनुभव..

कारगील युद्धाचा इतिहास पाहिला, तर काही देशांनी आपल्याला जुनाट, कामचलाऊ निकृष्ट दर्जाची किंवा बिघडलेली शस्त्रास्त्रे विकली होती. त्यावेळी आपल्याला नितांत गरज होती. शस्त्रास्त्रे मिळूनही त्याचा फायदा झाला नाही. असाच प्रकार आताही घडू शकतो. एखादा पट्टीचा मल्ल आक्रमक चिथावणी देऊन दुसऱ्या मल्लाला आखाड्यात येण्यास भाग पाडतो. आताची स्थिती तशीच आहे का? हे सुद्धा पडताळून पाहायला हवे. जेव्हा आपल्याला राग येतो, त्यावेळी रागातील सर्वप्रथम कृती ही घातकच असते. तावातावात घेतलेले निर्णय अंगलट येतात. बाण सुटून गेल्यावर काहीच करता येत नाही. तो कुठे? कसा? आणि केव्हा? सोडायचा याचे भान असायला हवे.

### मोठमोठ्या अपेक्षा आणि दबाव..

वर्तमान हा अपेक्षा आणि दबावाचा असला, तरी भविष्याचा विचार करूनच भारत सरकार आणि सैन्य दलांनी व्यूहनीती आखायला हवी, तसे झाले तर पहलगामचे हल्लेखोर, त्यांना बळ देणारे आणि खरे सूत्रधार हे सारेच गारद होतील. शिवाय शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ असून, भारताने केलेल्या कारवाईची जगभर यथोचित दखलही घेतली जाईल. जगाच्या दहशतवादविरोधी लढ्यात हा मैलाचा दगड ठरेल ! थोडं दमानं घ्या.. पंतप्रधानांकडून आपली ही अपेक्षा आहे, ती नक्की पूर्ण होणार आहे, फक्त त्यांच्यावर विश्वास ठेवून काही काळ मुक्ताफळं न उधळता गप्प बसायला हवं, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अजित पवार गटात प्रवेश कोण करणार?

## अंजली दमानिया आणि सुषमा अंधारेंमध्ये ट्विटर-वॉर

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या व प्रवक्त्या सुषमा अंधारे आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यात ट्वीटर वॉर रंगलं आहे. अंजली दमानिया यांनी त्यांच्या व्हॉट्सॲप ब्रॉडकास्टवर टाकलेल्या एका मेसेजमुळे हा वाद उफाळून आला आहे.**



अंजली दमानिया यांनी त्यांच्या व्हॉट्सॲप ब्रॉडकास्ट मेसेंजरवरून सुषमा अंधारे अजित पवार गटात प्रवेश करणार का? असा प्रश्न विचारला होता. त्यांच्या या ब्रॉडकास्टचं स्क्रीन शॉट काढून सुषमा अंधारे यांनी एक्सवरून त्यांच्यावर टीका केली. सुषमा अंधारे म्हणाले, "अहो दमानिया, जरा दमानं घ्या की.. किती तो प्रसिद्धीझोतात राहण्याचा सोस. कधीतरी पूर्ण, महत्त्वाचं म्हणजे अधिकृत माहिती घेत चला. ब्रॉडकास्टिंगवर टाकलेल्या मेसेजचा अर्थ काय घ्यायचा? तुम्ही माझ्या PR म्हणून काम करत आहात की, ठरवून ओबीसी नेते आणि चळवळ संपवण्याची मोहीम हाती घेतली आहे?" असा प्रश्न सुषमा अंधारेंनी विचारला.सुषमा अंधारेंच्या या ट्वीटला अंजली दमानिया यांनीही लागलीच उत्तर दिलं. त्या म्हणाल्या, केवळ आडनावाने तुम्ही मला संबोधता? छान. असो. मला तर ते पण करता येणार नाही. कारण केवळ अंधार आहे. खरंतर अशी भाषा वापरायला मला आवडत नाही, पण तुम्ही जे शब्द वापरले, त्यावर वाईट वाटले. मला खात्रीशीर माहिती अगदी, फेब्रुवारी महिन्यात मिळाली होती, की तुम्ही अजित पवारांना त्यांच्या घरी जाऊन भेटला होतात आणि त्यांच्या पक्षात जाणार होतात. हे खरे आहे की नाही ह्यावर खरं उत्तर द्याल का? बातमी करायची असती तर तेव्हाच केली असती. पण तुम्ही कुठेही गेलात तरी मला काय फरक पडतो, म्हणून बोलले नाही. तुम्ही कुठल्याही पक्षात जाणार असाल तर नक्कीच जा, तो तुमचा वैयक्तिक निर्णय आहे, तुम्हाला त्यासाठी शुभेच्छा. आणि हो प्रकाशझोतात यायची मला गरज नाही. प्रकाशझोतात ज्यांना यायचं असतं ते वाट्टेल ते करतात... त्यासाठी एखाद्या पक्षाच्या अध्यक्षांबद्दल वाट्टेल ते बोलतात आणि मग त्याच पक्षात जाऊन नेत्या बनतात, हे मला ह्या जन्मी जमणार नाही. तुमच्या माहितीसाठी, काल एका चॅनलने बातमी ट्वीट केली की ठाकरे गटातील कोणीतरी अजित पवार गटात जाणार, ह्यावर मी फक्त माझ्या वैयक्तिक MEDIA BROADCAST च्या व्हॉट्सअप ग्रुपवर लिहिलेला हा एक प्रश्न होता. तो तुम्हाला कोणीतरी पाठवला."अंजली दमानिया यांनी दिलेल्या या सविस्तर उत्तरानंतरही सुषमा अंधारे यांनी पुन्हा एक्सवरून पोस्ट केली. त्या म्हणाल्या, "दमानिया तुम्ही आडनाव बघून अजेंडे चालवता हे वास्तव आहे. ठाकरे-पवार यांना लक्ष्य करताना नागपूर आणि परिसरातील फडणवीस बावनकुळे मुनगुंटीवार यांच्यावर तुमची वक्रदृष्टी का नसेल? असो, ज्यांच्या पे रोलवर काम करता त्यांच्याकडून माहिती नीट घ्या. चुकीच्या बिळात हात घातला तर दंश महागात पडेल..!"जाहीरपणे एवढी टीका-टीप्पणी झाल्यानंतरही दोघी शांत बसल्या नाहीत. सुषमा अंधारेंच्या या ट्वीटवर अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा उत्तर दिले. त्या म्हणाल्या, "ठाकरे, पवार, फडणवीस, मुनगंटीवार, बावनकुळे, ह्या सगळ्यांना पाहून घेऊच, पण प्रश्नाचे उत्तर का बरं दिले नाहीत? १) अजित पवारांच्या घरी गेला होतात की नाही, आणि २) पक्ष प्रवेश करणार होतात की नाही" या दोन प्रश्नावर अंजली दमानिया ठाम राहिल्या आहेत.त्यांच्या या प्रश्नावर सुषमा अंधारे म्हणाल्या, "बाई आपण अशक्य मूर्ख प्रांतात आहेत. फुकट फौजदारकी तुमच्याजवळ राहू द्या. तुमच्या प्रश्नाला उत्तर द्यायला तुम्ही कुणी तीसमार खान नाहीत. तुम्ही कुणाच्या पे रोलवर काम करता हे आधी स्पष्ट करा. जमल्यास अमृता फडणवीसांनी अनिक्षा जयसिंगानीच्या विरोधात का FIR का केली यावर अक्कल पाजळा."

### स्क्रीनशॉट अन् प्रश्नांची सरबत्ती!

अंजली दमानिया यांनी त्यांच्या व्हॉट्सॲप ब्रॉडकास्ट मेसेंजरवरून सुषमा अंधारे अजित पवार गटात प्रवेश करणार का? असा प्रश्न विचारला होता. त्यांच्या या ब्रॉडकास्टचं स्क्रीन शॉट काढून सुषमा अंधारे यांनी एक्सवरून त्यांच्यावर टीका केली. सुषमा अंधारे म्हणाले, "अहो दमानिया, जरा दमानं घ्या की.. किती तो प्रसिद्धीझोतात राहण्याचा सोस. कधीतरी पूर्ण, महत्त्वाचं म्हणजे अधिकृत माहिती घेत चला. ब्रॉडकास्टिंगवर टाकलेल्या मेसेजचा अर्थ काय घ्यायचा? तुम्ही माझ्या PR म्हणून काम करत आहात की, ठरवून ओबीसी नेते आणि चळवळ संपवण्याची मोहीम हाती घेतली आहे?" असा प्रश्न सुषमा अंधारेंनी विचारला.

# देशभक्ती रुजविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत

## एनडीएमध्ये जाण्यासाठी शाळांनी प्रयत्न करावे : दादा भुसे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यातील जास्तीत जास्त तरुण एनडीएमध्ये जाण्यासाठी सैनिकी शाळांनी चौकटीच्या बाहेर जाऊन प्रयत्न करावेत. सातारा येथील सैनिक शाळेची अभिमान वाटावा अशी कारकीर्द कायम राहीली आहे. येथील शाळेच्या कामगिरीप्रमाणे काम करण्यासाठी इतर शाळांना याचा उपयोग व्हावा यासाठी सातारा येथे राज्यातील सैनिकी शाळांची बैठक घेतल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितले.**



सातारा येथील सैनिकी शाळेस शालेय शिक्षण मंत्री दादा भूसे यांनी भेट दिली. राज्यातील ३८ सैनिकी शाळांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस यवतमाळचे खासदार संजय देशमुख, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, महाराष्ट्र राज्य शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहूल रेखावार, कोल्हापूरचे शिक्षण उपसंचालक महेश चौथे, सातारा सैनिक शाळेचे प्राचार्य के. श्रीनिवासन यांच्यासह राज्यातील ३८ सैनिकी शाळेचे प्राचार्य, पदाधिकारी, प्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.राज्यातील सैनिकी शाळांचे जास्तीत जास्त तरुण एनडीएमध्ये जाण्यासाठी सैनिकी शाळांनी चौकटीच्या बाहेर जाऊन प्रयत्न करावेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून या शाळांना येणाऱ्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर निश्चीत प्रयत्न करेन, असे प्रतिपादन भुसे यांनी केले.राज्यामध्ये सातारा व चंद्रपूर येथे शासकीय सैनिकी शाळा तर राज्यामध्ये सैनिकी शाळेमध्ये१२ हजार २२४ विद्यार्थी असल्याचे सांगून शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, सैनिकी शाळांमधून प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये देशसेवा, देशभक्ती रुजविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

### शाळेत मराठी बंधनकारक

या शाळा इतर शाळांपेक्षा वेगळ्या असून याच्यामागे देशप्रेम, राष्ट्रीयत्वाची भावना जोडली आहे. सैनिका शाळा देशाची प्रतिमा उंचावण्याचे काम करतात. हे काम करताना त्यांना अनेक आव्हानांचा तसेच आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो. पीपीई मॉडेल, अभ्यासक्रम, धोरणांची अंमलबजावणी, सैनिकी शाळांसाठी स्वतंत्र बोर्डाची मागणी, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फिल्डवरील अनुभव मिळण्यासाठीचे नियोजन असावे, कमांडट नियुक्तीचे धोरण, स्टाफींग पॅटर्न, एनसीसी, संस्थांचे सबळीकरण यासारख्या शाळांच्या अडचणी सोडविण्यासाठी बैठका घेऊन शाळांचे प्रश्न मार्गी लावले जातील , असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.मराठी मंडळाच्या माध्यमातून सीबीएसी पॅटर्नच्या चांगल्या गोष्टींचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल.मराठी हे आपले दैवत आहे. इतर माध्यमांच्या शाळेत मराठी बंधनकारक आहे. यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

# भारताकडून पाकिस्तानची चहुबाजूने कोंडी!

## पाकिस्तानातून भारतात आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर बंदी

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात भारतातील २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या नंतर भारताने पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेत त्यांची चहूबाजूने कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. आधी सिंधु जल करार स्थगित करून पाणीकोंडी करण्याचा प्रयत्न केल्यानंतर आता अर्थव्यवस्थेलाच सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला आहे. तसंच, तेथील कुरिअर सेवेवरही पाबंदी आणली आहे. आज भारत सरकारने पाकिस्तानविरोधात अनेकविध निर्णय घेतले.**




पाकिस्तानातून भारतात आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर भारताने बंदी आणली आहे. वाणिज्य मंत्रालयाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. “पाकिस्तानमधून भारतात होणाऱ्या सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मग ती मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो किंवा नसो, पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित असेल. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हे निर्बंध लादण्यात आले आहेत. या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्व परवानगी आवश्यक असेल”, असं अधिसूचनेत म्हटलं आहे.तर, भारत सरकारने पाकिस्तानमधून हवाई आणि भूपृष्ठ मार्गाने येणाऱ्या सर्व प्रकारच्या टपाल आणि पार्सलची देवाणघेवाण स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं भारत सरकारने स्पष्ट केलं आहे. यामुळे पाकिस्तानातून होणारं दळणवळण थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून संपर्कच तोडण्यात आला आहे.भारताने शनिवारी भारतीय बंदरांवर पाकिस्तानी जहाजांच्या प्रवेशावर बंदी घातली आणि भारतीय जहाजांना पाकिस्तानी बंदरांना भेट देण्यासही बंदी घातली, असे बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या जहाजबांधणी महासंचालनालयाने (DGS) जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे. “भारतीय मालमत्ता, मालवाहू आणि जोडलेल्या पायाभूत सुविधांची सुरक्षितता, सार्वजनिक हितासाठी आणि भारतीय जहाजबांधणीच्या हितासाठी” सुनिश्चित करण्यासाठी “तात्काळ प्रभावाने” आणि “पुढील आदेशापर्यंत” हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत, असे DGS च्या आदेशात म्हटले आहे.जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाघा-अटारी सीमा देखील बंद करण्यात आलेली आहे. तसेच भारतातील पाकिस्तानी नागरिकांना देखील भारत सोडण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. पाकिस्तानी विमानांसाठी भारताने आपलं हवाई क्षेत्र बंद केलेलं आहे. यानंतर आता पाकिस्तानमधून होणाऱ्या सर्व आयातीवर भारताने बंदी घातली आहे. त्यामुळे या सर्व निर्णयाचा परिणाम पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर होणार असल्याचं बोललं जात आहे.“हे पाऊल उचलण्यामागील उद्दिष्ट राष्ट्रीय हितासाठी सर्वात योग्य पद्धतीने भारतीय व्यापारी सागरी जहाजाच्या विकासाला चालना देणे आणि कार्यक्षम देखभाल निश्चित करणे आहे,” असे मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे. “पाकिस्तानचा ध्वज असलेल्या जहाजाला कोणत्याही भारतीय बंदरात येण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि भारतीय ध्वज असलेल्या जहाजाला पाकिस्तानच्या कोणत्याही बंदरात जाण्याची परवानगी मिळणार नाही,” असेही आदेशात पुढे म्हटले आहे. या आदेशातून कोणाला सूट द्यायची की नाही, याचा निर्णय सूट मागणाऱ्याची चौकशी आणि प्रकरणानुसार घेतला जाणार आहे.

### टपाल आणि पार्सल सेवा बंद

पार्श्वभूमीवर पाकिस्तानमधून होणाऱ्या सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आयातीवर बंदी घातली आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे. भारताच्या या निर्णयाचा फटका पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे. या बंदीच्या निर्णयाअंतर्गत पाकिस्तानमधून येणाऱ्या कोणत्याही उत्पादनाच्या आयातीवर पूर्णपणे बंदी असणार आहे. एवढेच नाही तर पाकिस्तानमधून एखादी वस्तू आयात होणारी असो किंवा अप्रत्यक्षपणे दुसऱ्या कोणत्याही देशातून पाकिस्तानी वस्तू भारतात आयात होणार असेल तर त्यावरही बंदी असणार आहे.

# आपण पाकिस्तानइतके क्रूर नाही!

## भारत हा गांधींचा देश आहे: फारुख अब्दुल्ला यांचे मत

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांनी भारत “पाकिस्तानइतका क्रूर” नाही असे प्रतिपादन करताना म्हटले की, आपण पाणी थांबवू शकतो, “पण आपण त्यांना मारणार नाही”. जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम जिल्ह्यात २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर भारताने पाकिस्तानसोबत १९६० चा सिंधू पाणी करार थांबवल्याचा संदर्भात प्रतिक्रिया देताना अब्दुल्ला यांनी हे विधान केले.**




एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना फारूख अब्दुल्ला म्हणाले, “भारत हा गांधींचा देश आहे, आपण त्यांना (पाकिस्तानला) धमकी दिली आहे की, आपण पाणी थांबवू, पण आपण त्यांना मारणार नाही. आपण त्यांच्याइतके क्रूर नाही.” “सिंधू पाणी करारावर स्वाक्षरी झाली तेव्हा जम्मू-काश्मीरमधील लोकांना विश्वासात घेतले गेले नाही. या करारामुळे जम्मू-काश्मीरचे सर्वात मोठे नुकसान झाले आहे. मी केंद्र सरकारला आवाहन करतो की, त्यांनी हे पाणी जम्मूच्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एखादी योजना सुरु करावी”, असे अब्दुला पुढे म्हणाले. दरम्यान फारूख अब्दुल्ला यांनी पहलगाममधील पर्यटकांची भेटी घेतली आणि काश्मीर हा भारताचा भाग होता आणि नेहमीच राहील असे प्रतिपादन केले. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सर्वात मोठा संदेश म्हणजे पर्यटक “घाबरलेले नाहीत”, असे एएनआय वृत्तात म्हटले आहे.भीती पसरवणारे लोक हरले आहेत. ते (दहशतवादी) हरले आहेत. आज हे सिद्ध झाले आहे की, आपण घाबरणार नाही. काश्मीर भारताचा भाग होता आणि नेहमीच राहील. लोकांना दहशतवाद संपवायचा आहे. आपल्याला प्रगती हवी आहे.

### भारताची पाकिस्तानवर कारवाई

आपल्याला पुढे जायचे आहे. आपण एक दिवस महासत्ता बनू,” असेही अब्दुल्ला म्हणाले.पहलगाम हल्ल्यानंतर कठोर उपाययोजना म्हणून, भारताने सिंधू जल करार स्थगित केला आहे. अटारी सीमा बंद केली असून, पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व व्हिसा रद्द केले आहेत. याचबरोबर अनेक पाकिस्तानी यूट्यूब चॅनेल आणि एक्स हँडल्सवर भारतात बंदी घालण्याची कारवाई सुरू केली आहे. दुसरीकडे पाकिस्ताननेही भारतीय विमान कंपन्यांसाठी त्यांची हवाई हद्द बंद केली आहे. याचबरोबर पाकिस्तानी राजकीय नेते भारताविरोधात चिथावनीखोर विधाने करत आहेत. “भारत हा गांधींचा देश आहे, आपण त्यांना (पाकिस्तानला) धमकी दिली आहे की, आपण पाणी थांबवू, पण आपण त्यांना मारणार नाही. आपण त्यांच्याइतके क्रूर नाही.” “सिंधू पाणी करारावर स्वाक्षरी झाली तेव्हा जम्मू-काश्मीरमधील लोकांना विश्वासात घेतले गेले नाही.

# शाहरुख खान करतो घरातली कामं

आजपर्यंत शाहरुख खानने अनेक हिट सिनेमे केले. रोमँटिक, ॲक्शन आणि कॉमेडी सर्व प्रकारच्या सिनेमांमध्ये त्याने महत्त्वाच्या भूमिका केल्या. २०१८ च्या 'झिरो' चित्रपटानंतर शाहरुख खान बराच काळ चित्रपटांपासून दूर राहिला आणि चार वर्षे पूर्ण केल्यानंतर तो २०२३ मध्ये 'पठाण' चित्रपटात दिसला. यानंतर त्याचा 'जवान' चित्रपट प्रदर्शित झाला आणि तोही ब्लॉकबस्टर ठरला आणि त्यानंतर तो 'डंकी'मध्येही दिसला. आता शाहरुख पुन्हा एकदा चित्रपटांमध्ये ॲक्टिव्ह झाला आहे, पण जेव्हा तो ब्रेकवर होता तेव्हाही तो 'आस्क मी एनीथिंग' सेशनद्वारे त्याच्या चाहत्यांशी संपर्क साधत होता.शाहरुख खानने स्वतःबद्दल सांगितले की, जेव्हा तो शूटिंग करत नसतो तेव्हा तो काहीही करत नाही. अलीकडेच किंग खान १ मे रोजी मुंबईत झालेल्या 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट'च्या उद्घाटन समारंभाला उपस्थित होता.

# अबीर गुलालवरील बंदीनंतर, वाणी कपूर सावध

काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी मोठा दहशतवादी हल्ला झाला. यानंतर दहशतवाद्यांविरोधात देशभरातून तीव्र निषेध करण्यात आला. अनेक कलाकारांनीही सोशल मीडियामार्फत पोस्ट करीत त्यांच्या भावना व्यक्त केल्या; तर हल्ला झाल्यानंतर सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले. पाकिस्तानचे सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन करण्यात आले, तर काही दिवसांपूर्वीच काश्मीरमध्ये हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानी कलाकार सहभागी असलेल्या कलाकृतींवर बंदी आणली. यासह काही दिवसांनंतर आता पाकिस्तानी कलाकारांचेही सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन केले आहेत. गेल्या काही दिवसांत पाकिस्तानी अभिनेता फवाद खान मुख्य भूमिकेत असलेल्या 'अबीर गुलाल' या चित्रपटाची बरीच चर्चा झाली होती. हा चित्रपट ९ मे रोजी प्रदर्शित होणार होता. परंतु, काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या चित्रपटाला बॅन करण्यात आलं आहे.यामध्ये फवाद खानसह अभिनेत्री वाणी कपूरही मुख्य भूमिकेत होती. पण, चित्रपटाला बॅन करण्यात आल्याने आता वाणी कपूरने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून 'अबीर गुलाल' चित्रपटाच्या संदर्भातील सर्व फोटो व्हिडीओ डिलीट केले आहेत.'अबीर गुलाल' चित्रपटातून फवाद खान तब्बल नऊ वर्षांनी बॉलीवूडमध्ये पुनरागमन करणार होता; तर शेवटचा तो 'ए दिल है मुश्कील' या चित्रपटात झळकला होता.





# अमिषा-बिपाशात 36 चा आकडा

बॉलीवूडमध्ये 'कॅटफाईट्स'चे एक-दोन नव्हे तर अनेक किस्से आहेत. बबिता-नीतू कपूर, ऐश्वर्या राय-राणी मुखर्जी, प्रियांका चोप्रा-करीना कपूर, दीपिका पदुकोण-कतरिना कैफ, कंगना रणौत-तापसी पन्नू आणि स्वरा भास्कर अशी अनेक नावे आहेत. यापैकी एक नाव अमिषा पटेल आणि बिपाशा बासू यांचेही आहे. दोघांमध्ये ३६ चा आकडा आहे. करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमात दोघांनीही एकमेकांवर टीका केली होती.'फिल्मी मंत्रा'ला दिलेल्या मुलाखतीत अमिषा पटेलने स्पष्ट केले की तिने कधीही कोणाशीही भांडण केले नाही. हे प्रकरण बिपाशा बासूच्या 'जिस्म' या चित्रपटाशी संबंधित आहे. बॉलीवूडमधील भांडणं 'कॉफी विथ करण' या लोकप्रिय चॅट शोशी जोडलेले आहे. या शोमध्ये सहभागी होताना बिपाशा बासू आणि अमिषा पटेल यांनी एकमेकांबद्दल अशा कमेंट केल्या की त्या एकमेकांच्या कट्टर शत्रू बनल्या. आता 'गदर' अभिनेत्री म्हणते की त्यांच्यात असे काहीही नाही. तिने या गोष्टींना केवळ अफवा म्हटलं आहे.'कॉफी विथ करण'च्या एका भागात बिपाशा बासूने केलेल्या बॉडी-शेमिंगबद्दल विचारले असता, अमिषा म्हणाली, "मी कधीही त्यावर प्रतिक्रिया दिली नाही.

# 'त्या' वक्तव्यामुळे सोनू निगम अडचणीत

बॉलीवूडच्या काही प्रसिद्ध गायकांपैकी एक म्हणजे सोनू निगम. सोनू निगमने आजवर आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केलं आहे. त्याच्या आवजाचे आज केवळ देशभरातच नव्हे तर जगभरात लाखों चाहते आहेत. आपल्या गाण्यांमुळे कायमच चर्चेत असणारा सोनू निगम त्याच्या एका वक्तव्यामुळे अडचणीत सापडला आहे. नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये एका चाहत्याने गायकाकडे कन्नड गाण्याची मागणी केली असता सोनू निगमने त्याच्या वागण्याची तुलना थेट पहलगाम हल्ल्याशी केली आणि यामुळेच सोनू निगमविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. सोनू निगमच्या नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये तो हिंदी गाणं गात असताना एका विद्यार्थ्याने 'कन्नड कन्नड' ओरडत कन्नडमध्ये गाणं गाण्याची मागणी केली. यावर सोनूने मध्येच गाणे थांबवले आणि म्हटले की, "मी माझ्या कारकिर्दीत अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहेत, परंतु मी गायलेली सर्वोत्तम गाणी कन्नडमध्ये आहेत. मी जेव्हा जेव्हा तुमच्या शहरात येतो, तेव्हा मला खूप प्रेम आणि आदर मिळतो. तुम्ही माझ्यावर कुटुंबीयांसारखे प्रेम केले आहे. पण जेव्हा माझ्या कारकिर्दीइतकंही वय नसलेलं मुलं येऊन असं वागतं तेव्हा ते वाईट वाटते." यापुढे त्याने "यामुळेच पहलगामसारख्या घटना घडतात" असंही म्हटलं. सोनू निगमने चाहत्याने त्याच्याकडे जी मागणी केली होती, त्याची तुलना थेट पहलगाम हल्ल्याशी केल्याने काही संघटनांनी गायकाच्या असंवेदनशील वागण्याबद्दल आक्षेप घेतला आहे. यामुळेच कर्नाटक रक्षण वेदिके (केआरव्ही) या प्रमुख कन्नड संघटनेने बेंगळुरूमध्ये पोलिसांत सोनू निगम विरोधात तक्रार दाखल केली.

# कतरिना 'त्या' व्हिडीओमुळे होतेय ट्रोल

बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफ सध्या लाइमलाइटपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत आहे. काल रात्री कतरिना झोया अख्तरच्या घरी गेली होती. जेव्हा कतरिना कैफ येथून मेकअपशिवाय बाहेर पडताना दिसली, तेव्हा सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळल्या होत्या. कतरिना ओव्हरसाईज आऊटफिटमध्ये दिसली आणि तिच्यासोबत 'बार बार देखो' चित्रपटाची दिग्दर्शिका नित्या मेहरादेखील होती. खरंतर, झोयाच्या घरी झालेल्या एका पार्टीत कतरिनाची पहिली भेट विकी कौशलशी झाली होती, असे सांगितले जाते. काही वेळातच ते बॉलीवूडमधील सर्वात आवडत्या जोडप्यांपैकी एक बनले. त्यांनी त्यांचे नाते अनेक वर्षे लपवून ठेवले. कतरिना झोयाच्या घरी का गेली होती हे माहीत नाही. या नव्या लूकमुळे कतरिना सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून ट्रोल झाली आहे. कतरिनाला पाहून लोकांना ऐश्वर्या रायची आठवण येऊ लागली.कतरिनाची झलक पाहून लोकांनी कमेंट करायला सुरुवात केली आहे. एकाने म्हटले, 'तू आजारी आहेस का? मेकअपशिवाय अशी का फिरते, तीच बोरिंग हेयरस्टाईल, बोरिंग ड्रेस.' तर एकाने लिहिले, 'कतरिना आता संस्कारी झाली आहे आणि नेहमीप्रमाणे काहींनी पुन्हा विचारले, कतरिना गर्भवती आहे का?' दुसऱ्याने म्हटले, 'ही ऐश्वर्या रायसारखी होत आहे. 'लग्नाआधी विकी आणि कतरिना यांनी त्यांच्या नात्याबद्दल कोणाला कळूदेखील दिलं नाही. ९ डिसेंबर २०२१ मध्ये शाही थाटात विकी कौशल आणि कतरिना कैफ यांनी लग्न केलं. दोघांच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओदेखील सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते.विकी कौशलने पिंकव्हिलाला दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते की, त्यांची पहिली ऑफिशिअल भेट २०१९ मध्ये झालेल्या स्क्रीन अवॉर्ड्समध्ये झाली होती. तो म्हणाला होता, "तर मी होस्ट करत होतो, मी तिला पहिल्यांदाच भेटलो आणि तिच्याशी बोललो, ती खूप गोड दिसत होती."कतरिना कैफच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मेरी ख्रिसमस' या तमिळ चित्रपटात दिसली होती. त्याआधी बॉलीवूडच्या 'टायगर ३'मध्ये कतरिनाचा अभिनय पाहायला मिळाला होता. बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफ सध्या लाइमलाइटपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत आहे. काल रात्री कतरिना झोया अख्तरच्या घरी गेली होती. जेव्हा कतरिना कैफ येथून मेकअपशिवाय बाहेर पडताना दिसली, तेव्हा सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळल्या होत्या. कतरिना ओव्हरसाईज आऊटफिटमध्ये दिसली आणि तिच्यासोबत 'बार बार देखो' चित्रपटाची दिग्दर्शिका नित्या मेहरादेखील होती. खरंतर, झोयाच्या घरी झालेल्या एका पार्टीत कतरिनाची पहिली भेट विकी कौशलशी झाली होती, असे सांगितले जाते. काही वेळातच ते बॉलीवूडमधील सर्वात आवडत्या जोडप्यांपैकी एक बनले. त्यांनी त्यांचे नाते अनेक वर्षे लपवून ठेवले. कतरिना झोयाच्या घरी का गेली होती हे माहीत नाही. या नव्या लूकमुळे कतरिना सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून ट्रोल झाली आहे. कतरिनाला पाहून लोकांना ऐश्वर्या रायची आठवण येऊ लागली.



# आरसीबीचा चेन्नईवर चित्तथरारक विजय!

## अखेरच्या षटका केला पराभव; दयाल,रोमारियो ठरले हिरो

**| नवी दिल्ली |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**आरसीबीने चेन्नई सुपर किंग्सचा अखेरच्या षटकात २ धावांनी पराभव करत थरारक विजय मिळवला. या विजयासह आरसीबीचे गुणतालिकेत १६ गुण झाले असून संघ पहिल्या स्थानी पोहोचला आहे. संघ अधिकृतपणे प्लेऑफसाठी पात्र ठरला नसला तरी आरसीबी प्लेऑफच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली आहे. स्पर्धेतून बाहेर पडलेल्या चेन्नईसाठी सर्व सामने प्रतिष्ठेची लढाई असणार आहेत. या सामन्यात चेन्नईच्या फलंदाजांनी झुंज दिली खरी, पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. या विजयासह आरसीबीने आयपीएल इतिहासात प्रथमच चेन्नईचा एका सीझनमध्ये दोन वेळा पराभव केला आहे.**





अखेरच्या षटकात आरसीबीला विजयासाठी १५ धावांची गरज होती. यश दयालकडे गोलंदाजी सोपवण्यात आली. यशने पहिल्या दोन चेंडूंवर १-१ धाव दिली. यानंतर तिसऱ्या चेंडूवर एमएस धोनीला एलबीडब्ल्यू बाद करत मोठी विकेट मिळवली. यानंतर चौथ्या चेंडूवर शिवम दुबेने येताच षटकार लगावला. याचबरोबर हा चेंडू नो बॉल ठरला. यशने सलग तीन चेंडू अचूक यॉर्कर टाकत दुबे आणि जडेजाला धावा काढण्याची संधी दिली नाही आणि संघाला २ धावांनी थरारक विजय मिळवून दिला.आरसीबीने दिलेल्या २१४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईने चांगली सुरूवात केली. शेख रशीद आणि आयुष म्हात्रेने चांगली सुरूवात केली. पण शेख रशीद लवकर झेलबाद झाला. यानंतर सॅम करनही झटपट बाद झाला. यानंतर रवींद्र जडेजा आणि आयुष म्हात्रेने १०० हून अधिक धावांची भागीदारी करत संघाला सामन्यात कायम ठेवलं. आयुष म्हात्रे ४८ चेंडूत ९ चौकार आणि ५ षटकारांसह ९४ धावा करत बाद झाला.बेंगळुरूने पुन्हा एकदा घरच्या मैदानावर नाणेफेक गमावली आणि सलग पाचव्यांदा प्रथम फलंदाजी करावी लागली. पण कोहली आणि बेथलने धमाकेदार सुरुवात केली आणि १० षटकांत ९७ धावांची भागीदारी केली. बेथेलने त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावले, तर कोहलीने हंगामातील त्याचे सातवे अर्धशतक झळकावले. १२ व्या षटकात कोहली बाद झाल्यानंतर धावांचा वेग मंदावला आणि मधल्या फळीतील फलंदाज मथिशा पाथिरानाचे बळी ठरले.एकेकाळी बेंगळुरू १८ षटकांत फक्त १५९ धावांवर होता. पण रोमारियो शेफर्डने अद्भुत फलंदाजी केली आणि या हंगामात पहिल्यांदाच फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजच्या फलंदाजाने फक्त १४ चेंडूत ५३ धावा केल्या. आरसीबीने शेवटच्या २ षटकांत ५४ धावा केल्या, त्यापैकी ५२ धावा शेफर्डच्या होत्या.अखेरच्या षटकात आरसीबीला विजयासाठी १५ धावांची गरज होती. यश दयालकडे गोलंदाजी सोपवण्यात आली. यशने पहिल्या दोन चेंडूंवर १-१ धाव दिली. यानंतर तिसऱ्या चेंडूवर एमएस धोनीला एलबीडब्ल्यू बाद करत मोठी विकेट मिळवली. यानंतर चौथ्या चेंडूवर शिवम दुबेने येताच षटकार लगावला. याचबरोबर हा चेंडू नो बॉल ठरला. यशने सलग तीन चेंडू अचूक यॉर्कर टाकत दुबे आणि जडेजाला धावा काढण्याची संधी दिली नाही आणि संघाला २ धावांनी थरारक विजय मिळवून दिला.आरसीबीने दिलेल्या २१४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईने चांगली सुरूवात केली. शेख रशीद आणि आयुष म्हात्रेने चांगली सुरूवात केली. पण शेख रशीद लवकर झेलबाद झाला. यानंतर सॅम करनही झटपट बाद झाला. यानंतर रवींद्र जडेजा आणि आयुष म्हात्रे १०० हून अधिक धावांची भागीदारी करत संघाला सामन्यात कायम ठेवलं. आयुष म्हात्रे ४८ चेंडूत ९ चौकार आणि ५ षटकारांसह ९४ धावा करत बाद झाला.बेंगळुरूने पुन्हा एकदा घरच्या मैदानावर नाणेफेक गमावली आणि सलग पाचव्यांदा प्रथम फलंदाजी करावी लागली.

### रोमारियोने 14 चेंडूत 53 धावा केल्या

बेथेलने त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावले, तर कोहलीने हंगामातील त्याचे सातवे अर्धशतक झळकावले. १२ व्या षटकात कोहली बाद झाल्यानंतर धावांचा वेग मंदावला आणि मधल्या फळीतील फलंदाज मथिशा पाथिरानाचे बळी ठरले.एकेकाळी बेंगळुरू १८ षटकांत फक्त १५९ धावांवर होता. पण रोमारियो शेफर्डने अद्भुत फलंदाजी केली आणि या हंगामात पहिल्यांदाच फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजच्या फलंदाजाने फक्त १४ चेंडूत ५३ धावा केल्या. आरसीबीने शेवटच्या २ षटकांत ५४ धावा केल्या, त्यापैकी ५२ धावा शेफर्डच्या होत्या.आयुष म्हात्रेने आरसीबीविरूद्ध सामन्यात वादळी खेळी करत आयपीएल कारकिर्दीतील पहिलं अर्धशतक झळकावलं आहे. या खेळीसह चेन्नई सुपर किंग्सला सामन्यात कायम ठेवलं आहे. आयुष म्हात्रेने २५ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५० धावा करत आपलं पहिलं अर्धशतक पूर्ण केलं.


# वैभव सूर्यवंशी १४ वर्षांचा वाटतो का?

## वैभवच्या वयाबद्दल सुनंदन लेले यांनी सविस्तर माहिती दिली

**| नवी दिल्ली |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**आयपीएल २०२५ मध्ये भारताचे अनकॅप्ड युवा खेळाडू आपल्या कामगिरीने सर्वांनाच प्रभावित करत आहेत. पण यादरम्यान राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यातील वैभव सूर्यवंशीने आपल्या दमदार फटकेबाजीच्या जोरावर ३५ चेंडूंत शतक झळकावत सर्वांचे लक्ष वेधले. 'आयपीएल'मधील हे दुसरे सर्वात जलद शतक ठरले.**





तसेच ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या इतिहासात शतक झळकावणारा तो सर्वात युवा फलंदाज ठरला. या खेळीनंतर वैभवच्या वयाची चर्चा सुरू झाली. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ पत्रकार सुनंदन लेले यांनी व्हीडिओच्या माध्यमातून भारतीय क्रिकेट आणि वयचोरी याबाबत माहिती दिली आहे. चाहत्यांप्रमाणेच सुनंदन लेले यांनी वैभव सूर्यवंशीच्या वयाबाबत मुद्दा उपस्थित केला. सुनंदन लेले म्हणाले, "सुंदर पिचाई यांनी चक्क एक ट्विट केलं की मी वैभव सूर्यवंशी जो राजस्थान रॉयल्सकडून खेळतो त्याची बॅटिंग बघायला मी सकाळी जागा झालो आणि पहिल्या बॉलला वैभव सूर्यवंशीने षटकार मारला आणि हरखून गेलो काय टॅलेंट आहे भारतामध्ये पण सॉरी मी असं म्हणतोय की वैभव सूर्यवंशीकडे बघितल्यानंतर तो १४ वर्षांचा खेळाडू वाटतो का? मला तरी वाटत नाही."वैभवच्या वयाच्या मुद्द्याला जोडून सुनंदन लेले वय चोरलेले खेळाडू या त्यांच्या युट्युब व्हीडिओमध्ये म्हणाले, "चला आयपीएलमध्ये ही वयोमर्यादा नाहीय, तुम्ही ९ वर्षांच्या पोरालासुद्धा खेळवू शकता आणि

### उभारत्या खेळाडूंच्या यादीत नाव


कदाचित तुम्ही मला जुन्या काळातले विचार करणारे खेळाडू किंवा पत्रकार म्हणत असाल तर हा आरोप मला मान्य आहे. परंतु कुठला हिरा आहे कुठला दागड याचा थोडासा अंदाज येतो. आताच्या घडीला साई सुदर्शन अप्रतिम आणि सातत्याने बॅटिंग करतोय आणि उभारत्या खेळाडूंच्या यादीत आयुष म्हात्रेचं नाव आहे.

९० वर्षांच्या म्हाताऱ्याला सुद्धा खेळवू शकता, ही वयोमर्यादा नाहीये पण १४ वर्षाचा सेन्सशन खेळाडू ही मला पटत नाहीये एवढाच माझा मुद्दा आहे.सुनंदन लेले पुढे म्हणाले, "दुसरी गोष्ट म्हणजे अशी की हे जे खेळाडू आत्ताच्या घडीला ज्यांनी पहिल्या मॅचला ३५-३६ रन्स केलेले पाहून मिडियाने त्यांचे गोडवे गायला सुरुवात केली. अरे जरा थांबा पुढच्या मॅचेसमध्ये तो कसा खेळतोय, सातत्या राखतोय का, काही तंत्र आहे का, हे पाहा." वैभवच्या फलंदाजीबाबत ज्येष्ठ पत्रकार म्हणाले, "मला ही गोष्ट सांगायला अजिबात आनंद होत नाहीये की, वैभव सूर्यवंशीने डोळे मिटून फक्त बॅट दांड पट्ट्यासारखा फिरवताना दिसला. समोर यशस्वी जैस्वाल बरोबर बघून फटके खेळत होता. टाक पाय पुढे आणि फिरव पंखा म्हणजे काय तर काही बॉल लागतील काही बॉल लागणार नाहीत.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। रविवार ।
। दि. 4 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool




For more info

95277 64646 / 77967 67292

# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

